ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४२ • गुरुवार दि.५ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

'एमपीएससी'च्या गट-क ११ हजार नव्या पदांची शिफारस

वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत,उमेदवारांना पुन्हा अर्जाची संधी



मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मधील पदसंख्या ११ हजारांनी वाढविण्यासह उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस उच्चस्तरीय समितीने राज्य सरकारकडे केली आहे. नव्याने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची संधी देण्याची शिफारसही करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील सुमारे १२ लाख स्पर्धा परीक्षा उमेदवारांचे या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या निर्णयानुसार उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या महत्त्वाच्या आणि तातडीच्या प्रश्नांवर प्राधान्याने निर्णय घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन समितीने अंतरिम अहवाल शासनाला सादर केला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ साठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले आहेत. सध्या या परीक्षेसाठी पाच हजारांहून अधिक पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. अतिरिक्त पदांचा समावेश आणि वयोमर्यादेतील सवलतीमुळे नव्याने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना परीक्षेत सहभागी होता यावे, यासाठी अर्ज प्रक्रिया पुन्हा एकदा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे वयोमर्यादेमुळे परीक्षेची संधी हुकलेल्या उमेदवारांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे. गट-क पूर्व परीक्षेच्या विद्यमान परीक्षा पद्धतीत आणि अभ्यासक्रमात कोणताही बदल करू नये, अशी भूमिका समितीने घेतली आहे. सुरक्षित पद्धतीने नव्याने प्रश्नपत्रिका तयार करण्याचा प्रस्तावही समितीने मांडला आहे. भरती परीक्षांमधील पान ४ वर

गोकुळचा सत्तासंघर्ष पेटला; ९ नोव्हेंबरला संघर्ष मोर्चा!

सतेज पाटील यांची रस्त्यावर व न्यायालयीन लढाईची घोषणा;उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा

मुंबई/प्रतिनिधी-गोकुळ दूध संघातील शासन नियुक्त संचालकांची संख्या वाढविण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून कोल्हापुरातील राजकीय वातावरण तापले आहे. या निर्णयाविरोधात काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी न्यायालयीन लढाईसह रस्त्यावरच्या संघर्षाची घोषणा केली आहे. येत्या ९ नोव्हेंबर रोजी दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत 'कोल्हापूरचा संघर्ष मोर्चा' काढण्यात येणार आहे.

गोकुळच्या निवडणुकीत राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीला बहुमत मिळाले असताना शासन नियुक्त संचालकांच्या माध्यमातून मागच्या दाराने सत्तेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आमदार सतेज पाटील यांनी केला. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमांमध्ये बदल करणे म्हणजे साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या जनादेशाचा अवमान असल्याचेही त्यांनी म्हटले.या निर्णयामागे पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि मंत्री चंद्रकांत पाटील हेच सूत्रधार असल्याचा आरोप सतेज पाटील यांनी केला. केवळ गोकुळ दूध संघाला लक्ष्य करून कायद्यात बदल करण्यात आल्याचा दावा करत, सहकारी संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणली जात असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, शासन नियुक्त संचालकांच्या निवडीवरून महायुतीतील शिंदे गटात नाराजी असल्याची माहिती सूत्रांनी पान ४ वर

पोलीसांनी २४ तासात आरोपीला कोर्टात हजर करणे अनिवार्य

सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

नवी दिल्ली:एखाद्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतल्यापासूनच २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्याची घटनात्मक मुदत सुरू होते. औपचारिक अटक केल्यानंतर ही मुदत सुरू होते, असा अर्थ लावता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पोलिसांकडून ताब्यात घेणे आणि औपचारिक अटक करणे या दोन्ही प्रक्रियांमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येत



असल्याने त्यांच्यात कायदेशीर फरक करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने काही उच्च न्यायालयांनी घेतलेल्या भूमिकेवरही टीका केली. ताब्यात घेणे आणि औपचारिक अटक करणे या दोन वेगवेगळ्या कायदेशीर स्थिती मानून २४ तासांच्या मुदतीचा अर्थ लावणे घटनात्मकदृष्ट्या योग्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.न्यायालयाच्या मते, एखाद्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. त्यामुळे केवळ औपचारिक पान ४ वर

दुष्काळाचा दुहेरी दणका;ज्वारी सात,गहू साडेचार हजारावर



देगलूर/प्रतिनिधी-निसर्गाच्या लहरीपणाने यंदा शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असतानाच आता बाजारपेठेत धान्याचे भाव गगनाला भिडू लागले आहेत. कधीकाळी अवघ्या तीन हजार रुपये क्विंटलने विकली जाणारी ज्वारी आज थेट ६ ते ७ हजार रुपये क्विंटलवर पोहोचली आहे. तर अडीच हजार रुपये क्विंटलने मिळणारा गहू आता ४ हजार ते साडेचार हजार रुपये पर्यंत विकला जात आहे.

बाजारातील ही भाववाढ शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरण्याऐवजी दुष्काळाच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिकांची वाताहत झाली असून रब्बी हंगामावर ही मोठे संकट ओढवले आहे. पाण्याअभावी जमिनीला ओलावा नसल्याने अनेक भागात रब्बीची पेरणीच होऊ शकली नाही. परिणामी, ज्वारी आणि गव्हाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटण्याची चिन्हे आहेत. मागील वर्षी उत्पादित झालेली ज्वारी मोजक्याच शेतकऱ्याकडे शिल्लक असल्याने बाजारात ज्वारीची आवक कमालीची रोडावली आहे. गव्हाच्या काढणीच्या हंगामात शेतकऱ्यांना अवघ्या दोन हजार दोनशे रुपये प्रतिक्विंटल दराने गहू विकावा लागत होता. मात्र, यंदा पावसाअभावी रब्बीची पेरणीच झाली नसल्याने गव्हाचे उत्पादन घटले आहे. परिणामी, आता तुलनेने कमी दर्जाचा गहू देखील तब्बल ४५०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. उत्पादनाच्या वेळी कवडीमोल भाव आणि गरजेच्या वेळी दुप्पट दर, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. बाजारपेठेत शेतमालाला मिळणारा वाढीव दर पाहता शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत असले तरी प्रत्यक्ष परिस्थिती मात्र विदारक आहे. शेतात पिकले तरच बाजारात विकायला नेता येईल, मात्र यंदा पावसा अभावी उत्पादन निम्म्याहून अधिक घटण्याची भीती आहे. त्यामुळे वाढलेल्या दरांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे विक्री योग्य माल उरलेला नाही. दुसरीकडे आगामी काळात रब्बीचे उत्पादन घटल्यास गहू आणि ज्वारीच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्याकडून व्यक्त केली जात आहे. एकीकडे धान्याचे भाव गगनाला भिडले आहेत. तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक पाण्याअभावी करपून जात आहे. अशा या विचित्र परिस्थितीत बाजार भाव वाढले तरी शेतकऱ्यांच्या पदरी प्रत्यक्षात निराशाच पडत असल्याचे चित्र आहे.

वनोपज वाहतुकीला ई-टीपीचे बंधन;ऑफलाईन पासला बंदी


उपवनसंरक्षक मनीषा पाटील यांचे आदेश

किनवट/प्रतिनिधी-नांदेड वनविभागांतर्गत वनोपजाच्या वाहतुकविषयी यापुढेसुद्धा ई-टीपी प्रणाली कायम ठेवण्याचे उपवनसंरक्षक मनिषा पाटील यांनी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. राज्यांतर्गत आणि आंतरराज्यीय वनोपज वाहतूक परवान्यांसाठी डिजिटल प्रणालीचाच वापर करणे बंधनकारक करण्यात आले असून, कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन परवाने देण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. परिणामी पासेससाठी खाजगी व्यक्ती ठेवून मनमानी करण्याला लगाम लागलाय, हे विशेष.

उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या ज्ञापनानुसार, राज्यांतर्गत वनोपजाच्या वाहतूकसाठी सध्या वापरात असलेली 'ई-टीपी' प्रणाली यापुढेही सुरू राहणार असून, याद्वारेच वाहतूक पास निर्गमित करावेत. आंतरराज्यीय वाहतूक परवान्यासाठी जुनी ई-टीपी प्रणालीवरील सेवा आधीच बंद करण्यात आली असून, आता 'एनटीपीएस' प्रणालीद्वारेच वाहतूक पास निर्गमित करणे अनिवार्य आहे. मात्र, एनटीपीएस पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास राज्याच्या 'ई-टीपी' पोर्टलचा वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन पद्धतीने वाहतूक परवाना किंवा लिखित स्वरूपात पास निर्गमित करण्यात येऊ नये, असे सक्त निर्देश वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, सर्व सहायक वनसंरक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वनोपज वाहतूक परवाने व चलन पुस्तके विभागीय कार्यालयात जमा झाल्याबाबतची खात्री करून योग्य ती दक्षता घ्यावी, अशा सूचनाही प्रतिलिपीद्वारे देण्यात आल्या आहेत. पान ४ वर

'एसआयआर'वर विशेष अधिवेशनाची मागणी करा

अमित शहांचे विरोधकांना आव्हान;काँग्रेस घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप



नवी दिल्ली:मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष सुरू असतानाच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांना खुले आव्हान दिले आहे. एसआयआरच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यास तयार असल्याचे सांगत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यासाठी पत्र लिहावे, असे आवाहन शहा यांनी केले. काँग्रेसने खोटा प्रचार थांबवून संसदीय चर्चेला सामोरे जावे, असा टोलाही त्यांनी लगावला.

हरियाणातील कर्नाल येथे भाजपच्या वतीने आयोजित 'लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा' मोर्चात ते बोलत होते. यावेळी शहा यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. देशातील जनतेने नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवडले; मात्र विविध निवडणुकांमधील पराभवामुळे राहुल गांधी अस्वस्थ झाले असून, आपल्या पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडत असल्याचा आरोप त्यांनी केला.महाराष्ट्र, दिल्ली, बिहार आणि आसाममधील निवडणुकांचा संदर्भ देत शहा यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. हरियाणातही काँग्रेसने सत्तेत परतण्याचा दावा केला होता; मात्र मतमोजणीच्या पहिल्या पाच फेऱ्यांनंतरच त्यांच्या आशा धुळीस मिळाल्या. राज्यातील जनतेने सलग तिसऱ्यांदा भाजपला सत्ता दिली आणि नायब सिंग सैनी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली, असे ते म्हणाले.

उस्मानशाही मिल पुन्हा सुरु करा;नांदेडकरांचे आंदोलन

आर्थिक नियोजन करून अनुदान देण्याची उस्मानशाही मिल संवर्धन समितीची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहराची ओळख आणि औद्योगिक वैभव असलेली राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाची (एनटीसी) उस्मानशाही मिल गेल्या वीस वर्षांपासून बंद असल्याने शहराच्या औद्योगिक विकासाला खीळ बसली आहे. मिल बंद पडल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत असून बेरोजगारीतही वाढ झाली आहे. त्यामुळे उस्मानशाही मिल पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने योग्य आर्थिक नियोजन करून आवश्यक अनुदान उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी उस्मानशाही मिल संवर्धन समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक आंदोलन करण्यात आले.

यासंदर्भात समितीचे संयोजक तरुणम मोहम्मद यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर केले. नांदेड शहराचे वैभव असलेली एनटीसी मिल गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे या परिसरातील कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आले असून, मिलशी संबंधित रोजगाराच्या संधीही संपुष्टात आल्या आहेत. परिणामी शहराच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासावर विपरीत परिणाम झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नांदेड टेक्सटाइल मिल पुन्हा सुरू झाल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल. तसेच स्थानिक बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि पान ४ वर

दुष्काळग्रस्त कुटुंबांना ५० हजारांचे अनुदान द्या

सीटूचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे भूमिहीन शेतमजूर, शेतकरी, रोजंदारी कामगार आणि कष्टकरी कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. या कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान आणि पात्र कुटुंबांना दरमहा १० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी सीटू संलग्न नांदेड जिल्हा मजदूर युनियनच्या वतीने गुरुवारी (दि.५) जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून निघालेल्या मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांना सामूहिक निवेदन देण्यात आले. रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करावीत, दुष्काळग्रस्तांसाठी स्वतंत्र आर्थिक मदत योजना जाहीर करावी, वाहन कर्ज व बचतगटांच्या कर्जवसुलीला दोन वर्षांची स्थगिती द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. याशिवाय ऊसतोड कामगार पवळे कुटुंबाच्या उपोषणाची दखल घेऊन न्याय द्यावा, रेल्वे स्थानकावरील विद्यार्थी मंगेश वेदुवाड यांच्यावरील अन्यायाची चौकशी करावी आणि दुष्काळग्रस्तांचे वैयक्तिक अर्ज स्वीकारण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला. मोर्चात कॉ. गंगाधर गायकवाड, कॉ. उज्वला पडलवार, कॉ. वसीम अब्दुल, कॉ. करवंदा गायकवाड, कॉ. लता गायकवाड, कॉ. जयराज गायकवाड आणि कॉ. मंगेश वेदुवाड यांच्यासह विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

मनमानी कारभाराला जनमताचा आरसा

सत्ता मिळाली की आपण घेतलेला प्रत्येक निर्णय योग्यच आहे, आपल्याला कोणी प्रश्न विचारू नये आणि विरोधकांचे म्हणणे ऐकण्याची गरज नाही, अशी मानसिकता अनेक सत्ताधाऱ्यांमध्ये निर्माण होताना दिसते. लोकशाही व्यवस्थेत मात्र सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी असते, कोणाचीही खासगी मालमत्ता नसते. अमेरिकेतील ३ नोव्हेंबर रोजी झालेल्या मध्यावधी निवडणुकीच्या निकालांनी याच वास्तवाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयांचे आणि त्यांच्या प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे प्रतिबिंब या निकालांमध्ये उमटले आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाने प्रतिनिधिगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांमध्ये वर्चस्व मिळविले. रिपब्लिकन पक्षाच्या अनेक उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक नसतानाही या निवडणुकीला ट्रम्प यांच्या नेतृत्वाची जनमत चाचणी म्हणून पाहिले जात होते. या निकालांनी ट्रम्प यांच्या राजकीय वर्चस्वाला मर्यादा घातल्या आहेत. राष्ट्राध्यक्ष कितीही प्रभावशाली असला तरी जनतेच्या मनात निर्माण झालेली नाराजी मतपेटीतून व्यक्त होऊ शकते, हे या निवडणुकीने दाखवून दिले.ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात आयात शुल्क वाढविण्याचे धोरण, व्यापार युद्ध, स्थलांतरितांविषयीची कठोर भूमिका, इराण विरोधातील युद्ध आणि आर्थिक प्रश्नांवरून त्यांच्या प्रशासनावर टीका झाली. महागाई, इंधन दर आणि सामान्य नागरिकांच्या वाढत्या खर्चाचे प्रश्नही अमेरिकन जनतेसमोर होते. सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर होत असतो. त्यामुळे केवळ राजकीय भाषणे आणि घोषणांच्या जोरावर जनतेचा विश्वास कायम ठेवता येत नाही. या निवडणुकीतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रसारमाध्यमांची भूमिका. अमेरिकेतील फॉक्स न्यूज या प्रसिद्ध वृत्तवाहिनीने रिपब्लिकन उमेदवारांपेक्षा डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांना अधिक वेळ दिल्याची तक्रार स्वतः राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केली. ३० ऑक्टोबर रोजी फ्लोरिडातील प्रचारसभेत त्यांनी फॉक्स न्यूजवर नाराजी व्यक्त केली. डेमोक्रॅटिक पक्षाचे खासदार रो खन्ना यांना वारंवार वाहिनीवर स्थान दिले जात असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. निवडणुकीतील पराभवानंतर ४ नोव्हेंबर रोजी त्यांनी पुन्हा फॉक्स न्यूजवर टीका केली. विशेष म्हणजे, फॉक्स न्यूज ही परंपरेने रिपब्लिकन पक्षाच्या विचारांशी जवळीक असलेली वृत्तवाहिनी मानली जाते. तरीही आपल्या पक्षाला पुरेसा प्रसिद्धीचा वेळ मिळत नसल्याची तक्रार ट्रम्प यांनी केली. यावरून निवडणुकीच्या राजकारणात प्रसारमाध्यमांचे महत्त्व किती आहे, हे लक्षात येते.प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जातात. सत्ताधाऱ्यांच्या चुका दाखविणे, विरोधकांचे म्हणणे जनतेपर्यंत पोहोचविणे, सरकारी निर्णयांची चिकित्सा करणे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे माध्यमांचे मूलभूत कर्तव्य आहे. माध्यमांनी कोणत्याही पक्षाची बाजू घेण्याऐवजी सत्य आणि वस्तुस्थिती जनतेसमोर मांडली पाहिजे. मात्र, माध्यमेच सत्ताधाऱ्यांच्या प्रचाराची साधने बनली तर लोकशाहीतील संतुलन धोक्यात येते.भारतातही गेल्या काही वर्षांपासून 'गोदी मीडिया' या शब्दावरून मोठी चर्चा सुरू आहे. सत्ताधाऱ्यांना अनुकूल बातम्यांना प्राधान्य देणे, विरोधकांच्या प्रश्नांना पुरेसे स्थान न देणे, जनतेच्या मूलभूत समस्यांऐवजी भावनिक आणि वादग्रस्त विषयांना अधिक प्रसिद्धी देणे, अशा प्रकारच्या माध्यमांच्या कार्यपद्धतीवर टीका केली जाते. अर्थात, प्रत्येक वृत्तवाहिनी किंवा पत्रकाराला एका चौकटीत बसविता येणार नाही. परंतु माध्यमांनी सत्तेच्या जवळ जाण्याऐवजी सत्याच्या जवळ राहणे अपेक्षित आहे. ट्रम्प यांच्यासारख्या राष्ट्राध्यक्षांनाही आपल्याला अनुकूल प्रसिद्धी मिळावी, अशी अपेक्षा असते, हे फॉक्स न्यूजवरील त्यांच्या नाराजीतून दिसून येते. माध्यमांनी विरोधकांना किती वेळ द्यावा, यावर सत्ताधाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची अपेक्षा करणे हीसुद्धा लोकशाहीच्या दृष्टीने विचार करण्यासारखी बाब आहे.अमेरिकेतील निवडणुकीचा भारतानेही विचार करायला हवा. लोकशाहीत प्रसारमाध्यमांची जबाबदारी केवळ सत्ताधाऱ्यांचे गुणगान करण्याची नसते, तर सत्तेच्या गैरवापरावर बोट ठेवण्याचीही असते. विरोधकांचे अस्तित्व, स्वतंत्र पत्रकारिता आणि प्रश्न विचारण्याचा अधिकार हे लोकशाहीचे अविभाज्य घटक आहेत. सत्ताधाऱ्यांना अनुकूल बातम्या दाखविणारी माध्यमे लोकप्रिय होऊ शकतील; पण त्यामुळे जनतेचे प्रश्न संपत नाहीत. निवडणुकीतील विजय म्हणजे मनमानी कारभार करण्याचा परवाना नव्हे. जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करणे, घटनात्मक संस्थांचा आदर राखणे आणि विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. माध्यमांनीही सत्तेच्या दबावापासून मुक्त राहून जनतेच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. अमेरिकेतील निवडणुकीने एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली आहे. सत्ता कितीही मोठी असली, माध्यमांवर कितीही प्रभाव असला आणि राजकीय प्रचाराचे कितीही तंत्र वापरले तरी जनतेचा कौल बदलता येत नाही. कारण लोकशाहीत सत्ताधाऱ्यांपेक्षा जनमत मोठे असते आणि मनमानी कारभाराला आरसा दाखविण्याची ताकद मतदारांकडेच असते!

दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड;माहूर शिक्षण विभागाचा माणुसकीचा आधार

शिक्षकांच्या पुढाकारातून ४५० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप

सरफराज दोसानी





माहूर:दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या आयुष्यात अंधार असताना त्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याचे संवेदनशील काम माहूर तालुक्यातील शिक्षण विभागाने केले आहे. केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि गरजूंच्या मदतीची भावना रुजविण्याचा आदर्श प्रयत्न माहूरच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय आणि शिक्षकांनी पुढाकार घेऊन केला. 'बळीराजा आधार अभियान' या प्रकल्पांतर्गत 'बळीराजा आधार-एक हात मदतीचा' हा अभिनव सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून तालुक्यातील विविध गावांमधील गरजू शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना तब्बल ४५० जीवनावश्यक वस्तूंच्या राशन किटचे वाटप करण्यात आले.

दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न घटले, हाताला काम मिळण्याची भ्रांत निर्माण झाली आणि अनेक शेतकरी कुटुंबा-समोर रोजच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला. अशा कठीण परिस्थितीत दिवाळीचा सण साजरा करणेही अनेकांसाठी अवघड झाले होते. हीच सामाजिक जाणीव लक्षात घेऊन माहूर शिक्षण विभागाने मदतीचा हात पुढे केला. गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी या अभियानासाठी पुढाकार घेतला. शिक्षकांच्या सहकार्याने आणि सामाजिक बांधिलकीतून उभ्या राहिलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या किटमध्ये एक किलो खाद्यतेल, एक किलो चणाडाळ, दोन किलो साखर, चंदन उटणे, एक किलो रवा, बेसन, साबण, तूरडाळ आणि २५० ग्रॅम चहापत्ती अशा दिवाळीच्या सणासाठी आणि दैनंदिन वापरासाठी आवश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला. या ४५० किट गरजू शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यात आल्या. दिवाळीच्या तोंडावर घरात जीवनावश्यक वस्तूंची किट पोहोचल्याने अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद फुलला. एखाद्याच्या घरातील दिवाळीचा दिवा पेटविण्यासाठी आपणही हातभार लावू शकतो, याची प्रचिती या उपक्रमाने दिली. या अभियानातील सर्वांत हृदयस्पर्शी बाब म्हणजे विद्यार्थ्यांनीही या सामाजिक कार्यात घेतलेला सहभाग. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालवाडा येथील विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मदत फेरीचे आयोजन केले. स्वतःच्या खाऊसाठी मिळणाऱ्या पैशांतून थोडी थोडी बचत करून विद्यार्थ्यांनी या अभियानासाठी आपले योगदान दिले. वयाने लहान असलेल्या या चिमुकल्यांनी आपल्या आनंदातील वाटा दुसऱ्यांच्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी दिला, ही बाब निश्चितच समाजाला अंतर्मुख करणारी आहे. त्यांच्या या छोट्याशा योगदानातून मोठ्या माणुसकीचा संदेश मिळाला.मदत फेरीतून जमा झालेल्या निधीचा योग्य विनियोग करून तो दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी वापरण्याचा संकल्पही करण्यात आला. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील धडे न शिकवता प्रत्यक्ष कृतीतून सहवेदना, सहकार्य आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे संस्कार देण्याचे काम मालवाडा शाळेतील शिक्षकांनी केले. आजच्या काळात शिक्षण म्हणजे केवळ गुण, परीक्षा आणि प्रमाणपत्रे नव्हेत, तर दुसऱ्याच्या वेदना समजून घेणारे संवेदनशील मन घडविणे होय, हे माहूर शिक्षण विभागाच्या या उपक्रमाने दाखवून दिले. शिक्षकांनी उभा केलेला मदतीचा हात आणि चिमुकल्या विद्यार्थ्यांनी खाऊच्या पैशातून दिलेले योगदान यामुळे 'बळीराजा आधार-एक हात मदतीचा' हे अभियान केवळ मदतवाटपापुरते मर्यादित न राहता माणुसकीचा उत्सव ठरले आहे.

मुखेड उपजिल्हा रुग्णालयातील अनागोंदी कारभारावर आरोग्यमंत्र्यांच्या ओएसडींची झाडाझडती!

१५ दिवसांत सुधारणा करा,अन्यथा निलंबनासह कठोर कारवाईचा इशारा

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयातील भोंगळ कारभार, अस्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनियमित उपस्थिती, बंद अवस्थेतील अतिदक्षता विभाग (आयसीयू) आणि मुख्यालयी न राहण्याच्या गंभीर प्रकारांची आरोग्यमंत्री यांच्या विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) डॉ. स्वप्नील सांगळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून झाडाझडती घेतली. रुग्णालयातील अस्वच्छता आणि आरोग्यसेवेतील त्रुटी पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. येत्या १५ दिवसांत रुग्णालयाच्या कामकाजात ठोस सुधारणा कराव्यात, अन्यथा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

या पाहणी दरम्यान रुग्णालयातील विविध विभागांची तपासणी करण्यात आली. रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेताना अनेक त्रुटी निदर्शनास आल्या. अतिदक्षता विभाग बंद असल्याने गंभीर रुग्णांना आवश्यक सुविधा मिळण्यात अडचणी येत असल्याची बाबही समोर आली. तसेच रुग्णालयातील स्वच्छतेचा अभाव, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनियमित उपस्थिती आणि काही अधिकारी मुख्यालयी वास्तव्यास नसल्याच्या तक्रारींचीही त्यांनी गंभीर दखल घेतली. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांसाठी उपजिल्हा रुग्णालय हे महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, रुग्णालयातील सुविधांचा अभाव आणि प्रशासकीय अनागोंदीमुळे सर्वसामान्य रुग्णांना त्रास सहन करावा लागत असल्याचे पाहणीतून स्पष्ट झाले. शासनाकडून आरोग्य सुविधांसाठी निधी व मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जात असताना त्याचा प्रभावी वापर होत नसल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. रुग्णालयातील सर्व विभागांची नियमित स्वच्छता ठेवावी, आयसीयू विभाग तातडीने कार्यान्वित करावा, रुग्णांना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहून मुख्यालयी वास्तव्यास राहावे, अशा स्पष्ट सूचना डॉ. सांगळे यांनी संबंधितांना दिल्या. केवळ कागदोपत्री पूर्तता न करता प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा दिसली पाहिजे, असेही त्यांनी बजावले. या पाहणीवेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी गरुडकर यांच्यासह रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली असून या कालावधीत रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा न झाल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल. त्यामुळे आरोग्य यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आता तरी आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यानाची नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्याकडून पाहणी



कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील हुतात्मा स्मारक आणि शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यानाला दि. ४ रोजी नगराध्यक्ष शहाजी नळगे यांनी सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. यावेळी दोन्ही सार्वजनिक ठिकाणांवरील असुविधा, स्वच्छतेचा अभाव आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेत संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

हुतात्मा स्मारक परिसरात नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या विविध सोयी-सुविधांचा अभाव तसेच काही आवश्यक वस्तूंची कमतरता असल्याचे यावेळी निदर्शनास आले. या समस्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींबाबत त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत स्मारक परिसरातील सुविधा अधिक सक्षम व सुस्थितीत ठेवण्याचे निर्देश दिले.यानंतर शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यानाची पाहणी करताना परिसरातील अस्वच्छता, स्वच्छतेचा अभाव आणि देखभालीकडे होणारे दुर्लक्ष याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. काही युवकांकडून सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करण्यासारखे प्रकार घडत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारीही त्यांनी जाणून घेतल्या. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नगरपालिका व संबंधित प्रशासनाच्या माध्यमातून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना नगराध्यक्षांनी दिल्या.हुतात्मा स्मारक आणि उद्यान ही शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाची सार्वजनिक ठिकाणे आहेत. या परिसरांची स्वच्छता, सुरक्षितता आणि नियमित देखभाल राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असली, तरी त्यांचे जतन करणे हे प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. शहराचे सौंदर्य टिकविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी समन्वयाने काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक सुनील कांबळे, पत्रकार हफीज घडीवाला, पत्रकार थोटे सर, सचिन अग्रवाल, ऋषिकेश बसवंते यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

माहूर तालुका शिक्षक सेनेच्या कार्यकारिणीची निवड जाहीर

धनंजय गिऱ्हे तालुकाध्यक्ष,कृष्णा माने कार्याध्यक्ष

माहूर/प्रतिनिधी-शिक्षक सेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करून शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्याच्या उद्देशाने माहूर तालुका शिक्षक सेना कार्यकारिणीची निवड उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या निवड प्रक्रियेत तालुकाध्यक्षपदी धनंजय गिऱ्हे, तर कार्याध्यक्षपदी कृष्णा माने यांची निवड करण्यात आली.

शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ रोजी झालेल्या या बैठकीला शिवसेनेचे नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी नांदेड जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, जिल्हा सरचिटणीस रवि बंडेवार आणि माहूर तालुका प्रमुख जितू चोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तालुकाध्यक्ष सिद्धार्थ सोनकांबळे रातोळीकर, आशिष माहूरे आणि प्रसिद्ध चित्रकार रणजीत वर्मा यांची सन्माननीय उपस्थिती होती.बैठकीदरम्यान शिक्षक सेनेच्या आजवरच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर माहूर तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी धनंजय गिऱ्हे, कार्याध्यक्षपदी कृष्णा माने, कोषाध्यक्षपदी महेश गोविंदवार, सरचिटणीसपदी राहुल ढवळे, तालुका संघटकपदी शरदचंद्र मानकरी, तालुका उपाध्यक्षपदी मनोज मद्देवाड, तर तालुका समन्वयकपदी विजय खोंडे यांची निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या विविध समस्या, प्रलंबित प्रश्न आणि शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. शिक्षकांचे हक्क, न्याय आणि सन्मानासाठी शिक्षक सेनेने अधिक सक्रियपणे पुढाकार घेण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय शिणगारपुतळे यांनी केले, तर ज्ञानेश्वर येंजणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक सेना नांदेड यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मोतीराम माने, गौतम वाघमारे, ओम सूर्यवंशी, धम्मपाल कोकणे, सुरेश चाबुकस्वार, अमोल सूर्यवंशी, श्याम आवळे, देवा मुंडे, धम्मपाल होणसांगडे, पवार सर, कपिलकुमार जाधव आणि राजू राठोड जिल्हा समन्वयक रविराज माधवराव जाधव यांची उपस्थिती होती.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

तीन कोटी रुपये खर्च करुन बांधल्या ४ खोल्या आणि स्वच्छतागृह

भोकर सा.बां.विभागाचा अनागोंदी कारभार



भोकर/प्रतिनिधी-येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराचे अनेक नमुने समोर येत आहेत. निकृष्ट दर्जाची कामे, आवश्यकता नसताना करण्यात आलेली कामे, देयके वाढवून करण्यात आलेली कामे असाच प्रकार भोकर येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या खाली बांधण्यात आलेल्या कामावर झाला. ४ खोल्या व स्वच्छतागृह यावर ३ कोटी रु.खर्च झाला. प्रत्यक्षात काम मात्र अत्यंत कमी खर्चाचे असून दोन वर्षापासून करण्यात आलेल्या कामाचा नागरिकांना काहीही उपयोग नाही. उलट राष्ट्रपुरुषांचे पुतळे बसविण्यात आले मात्र त्यावर धूळ चढलेली असल्याने या कामांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

भोकर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विभागीय कार्यालय आहे. भोकर उपविभाग देखील त्याच कार्यालयात आहे. या उपविभागामार्फत करण्यात येत असलेल्या कामांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत असून प्रत्यक्षात नियमानुसार काम होत नसल्याच्या तक्रारी आहेत कामावर मोठ्या प्रमाणावर खर्च दाखविण्यात येतो. शहरात नगरपालिके कडून साबा विभागाला मिळालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असं वर्षभरातच सी.सी.रोडवर खड्डे पडलेले आहेत, बोरगाव पानंद रस्ता अर्धवट उरकण्यात आला आहे, ग्रामीण भागातील अनेक कामे दर्जाहीन होत असताना उपअभियंता व अभियंता याकडे दुर्लक्ष करतात, अधिकारीच गुत्तेदारी करीत असल्याची चर्चा देखील होत आहे.भोकर रेल्वे उड्डाण पुलाच्या खाली भुयारी मार्गाच्या समोर शहराचे सुंदरता स्वच्छता राखण्यासाठी ३ कोटी रु. खर्च करून ४ खोल्या आणि स्वच्छतागृह बांधण्यात आले अत्यंत कमी खर्चामध्ये काम करून सुद्धा या कामावर ३ कोटीचा खर्च दाखविण्यात आल्याने कामाबाबत नागरिकांमधून संशय व्यक्त केल्या जात आहे दोन वर्षापासून सदर काम झालेला असताना देखील कुलूप बंदच होते १ महिन्यापूर्वी या कामाचे लोकार्पण करण्यात आले मात्र त्यानंतर सुद्धा सदर खोल्यां कुलूप बंदच आहेत नागरिकांना मात्र या कामाचा काहीही उपयोग होत नाही. ३ कोटी रुपये खर्चून हे काम कशासाठी करण्यात आले याबाबत नागरिकांतून सवाल उपस्थित केला जात आहे.

सदर बांधकाम करण्यात आलेल्या ठिकाणी पोलीस चौकी उभारण्यात येत आहे म्हणून लोकर पण करण्यात आले मात्र दोन महिने उलटत असताना देखील पोलीस चौकी उभारण्यात आली नाही, त्या ठिकाणी शिवशोभीकरण दिसावे म्हणून राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्यात आले आहेत महात्मा गांधी यांची दांडी यात्रा त्यासोबत असलेल्या सर्व राष्ट्रपुरुष यांचे पुतळे आहेत मात्र त्या पुतळ्यांची देखभाल होत नसल्याने पुतळ्यावर धूळ चढलेली दिसत आहे याकडे कोणाचेही लक्ष नाही नागरिकांना विसावा आणि त्या ठिकाणी गार्डन दिसावी म्हणून हा उद्देश होता मात्र कुठलाच उद्देश या ठिकाणी साध्य होताना दिसत नाही. सदर कामाला राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या कामाचे लोकार्पण असे वेगळ्या पद्धतीचे नाव देण्यात आले आहे, सदर कामावर प्रत्यक्षात ३ कोटी रुपये खर्च झाले का? ४ खोल्या आणि स्वच्छतागृह यासाठी ३ कोटी रुपये खर्च कसे होऊ शकतात? या कामासह अनेक कामाच्या बाबतीत भोकर सा.बां. उपविभागाच्या कारभाराबाबत संभ्रम निर्माण झाला असून ग्रामीण भागात करण्यात आलेली अनेक कामे निकृष्ट दर्जाचे होऊन वर्षभरातच उखडून गेली आहेत.



शहर वाहतूक शाखा व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बाफना टी पॉईंट ते देगलूर नाका या मार्गावरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे. वाहतुकीला अडथळे आणणाऱ्या ७८ जणांवर कारवाई करुन दंड वसुल करण्यात आला.

नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर महत्त्वपूर्ण निर्णय;प्रलंबित मागण्यांबाबत आयुक्तांचे निर्देश



किनवट/प्रतिनिधी-नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर २ नोव्हेंबर रोजी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत चर्चा करण्यात आली. नगरपरिषद संघटनेच्या मागण्यांचा विचार करून स्वच्छता निरीक्षक कर्मचाऱ्यांचे कार्य, कर्तव्ये व अधिकार निश्चित करणे, पदोन्नतीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे, अपात्र ठरलेल्या ४४ स्वच्छता निरीक्षकांच्या समावेशनाचा प्रश्न विशेष बाब म्हणून मांडणे, रोजंदारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले.

अभिषेक जी. कृष्णा, आयुक्त तथा संचालक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीला नगरपरिषद संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे, संवर्ग संघटनेचे अध्यक्ष सुरेश पोसतांडेल, कार्यकारी अध्यक्ष पी.बी.भातकुले, उपाध्यक्ष पी.एस.रहांगडाले, मराठवाडा उपाध्यक्ष शिवहर शेटे, मराठवाडा सरचिटणीस राजू शिवलिंग पिल्लेवार, विशाल गोयल यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.स्वच्छता निरीक्षक कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप, कर्तव्ये आणि अधिकार याबाबत स्पष्टतेसाठी येत्या दोन दिवसांत आदेश निर्गमित करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. संबंधित पदाची सुधारित वेतनश्रेणी एस.१० ऐवजी एस.१३ करण्यासंदर्भात आणि स्वच्छता निरीक्षक या पदनामाऐवजी आरोग्य अधिकारी/आरोग्य निरीक्षक असे पदनाम करण्याबाबत चर्चा झाली. स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेशनासाठी ४४ अपात्र कर्मचाऱ्यांचा प्रलंबित प्रश्न विशेष बाब म्हणून शासनासमोर ठेवण्याचा निर्णय झाला. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या नवीन पदभरती प्रक्रियेत संबंधित कर्मचाऱ्यांना समावेशाची संधी मिळावी. सफाई कर्मचाऱ्यांसाठी लाड समितीने केलेल्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना देण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

शेतकरी मेळाव्यासाठी आ.रोहित पवार उद्या उमरखेडमध्ये

उमरखेड/प्रतिनिधी-यवतमाळ जिल्ह्यासह उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासन-प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, अतिवृष्टीमुळे झालेली शेतीची नासधूस, पीकविमा, नुकसानभरपाई आणि कर्जमाफीतील दिरंगाई विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ.रोहित पवार शुक्रवार, दि.६ नोव्हेंबर रोजी उमरखेड येथे काळी दिवाळी आंदोलनात सहभागी होणार आहेत.

यवतमाळ जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. सततची नैसर्गिक संकटे, शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव आणि शासकीय मदत वेळेवर न मिळाल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी उमरखेड येथे या प्रतीकात्मक आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलना दरम्यान आ.रोहित पवार शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार असून, त्यांच्या समस्या, व्यथा आणि मागण्या जाणून घेणार आहेत. शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, उमरखेड येथे विशेष शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला असूनया मेळाव्यात उमरखेड तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पीकविमा, अतिवृष्टी नुकसान भरपाई, कर्ज, शेतीमालाचे भाव, सिंचन व इतर प्रलंबित प्रश्न थेट आ.रोहित पवार यांच्यासमोर मांडावेत, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पैनगंगा प्रकल्पातील पाणी उपशावर प्रशासनाचे कडक नियंत्रण

अवैध मोटार पंप व विद्युत जोडण्या जप्त करा;नांदेड-यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पैनगंगा प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटेकोर वापर करून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे. नदीपात्रातून होणारा अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. यासंदर्भात नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांतील संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आली.

पाटबंधारे व महावितरण विभागाने नदीपात्रातील पाणी उपशाची दररोज पाहणी करून अनधिकृत मोटार पंप व विद्युत जोडण्या जप्त कराव्यात. गरजेनुसार संबंधित भागातील विद्युत डी.पी. बंद करण्याची कार्यवाही करावी. तसेच नदीकाठच्या गावांतील पोलीस पाटील, तलाठी व ग्रामसेवक यांनी नियमित पाहणी करून अनधिकृत पाणी उपशाची माहिती संबंधित विभागांना द्यावी, असे निर्देश देण्यात आले. यंदा नदीकाठच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार नसल्याने त्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड करावी आणि ऊसासारखी अधिक पाणी लागणारी पिके टाळावीत, यासाठी जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पिण्याच्या पाण्यासाठी पाणी आरक्षण व चार पाणीपाळ्यांना परवानगी असली तरी पाण्याचा अनधिकृत उपसा अथवा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचेही स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस दोन्ही जिल्ह्यांचे पाटबंधारे व महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रभावी नियोजन व काटेकोर अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

महागडा मोबाईल चोरट्यांनी पळविला

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील हर्षनगर रोडवर दुचाकीवर आलेल्या तीन चोरट्यांनी एका जणाच्या हातातील महागडा मोबाईल हिसकावून घेवून पळून गेल्याची घटना बुधवारी सकाळी घडली आहे. अरुण आंबाजी दुधमल (वय ४६) रा.हर्षनगर, नांदेड हे हर्षनगर रोडवर बुधवारी सकाळी मोबाईलवर बोलत पायी जात असतांना पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन चोरट्यांनी अरुण दुधमल यांच्या हातातील १ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मोबाईल हिसकावून घेवून चोरटे पळून गेले.

मुखेड डाक कार्यालयातून पन्नास हजार रुपये लंपास

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या मुख्य डाक कार्यालयातून अज्ञात चोरट्यांनी कॅश काऊंटरमधील ५० हजार रुपये चोरुन नेल्याची घटना बुधवारी सकाळी घडली आहे. डाक सहाय्यक सुरज रामराव वाघमारे हे बुधवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास मुख्य डाक कार्यालयात काम करीत असतांना अज्ञात चोरट्यांनी कॅश काऊंटरमधील ५० हजार रुपये चोरुन नेले आहे. सुरज वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १२५२/२०२६
व्यंकट व ईतर वि. निरंक
ने.ता.१४/१२/२०२६

अर्जदार:- १. व्यंकट पि.परशुराम शिंदे, वय : ५३ वर्षे, धंदा : व्यापार, रा.किल्ला रोड, बुरुड गल्ली जवळ, होळी, ईतवारा, नांदेड, २. शिंदे उमेश पि.परशुराम, वय : ५१ वर्षे, धंदा : व्यापार, ३. सतिश पि.परशुराम शिंदे, वय : ४८ वर्षे, धंदा : व्यापार, रा.किल्ला रोड, बुरुड गल्ली जवळ, होळी, ईतवारा, नांदेड, ४. शोभा भ्र.मनोहरराव सुर्वे, (रा.शोभा पि.परशुराम शिंदे) वय : ५९ वर्षे, धंदा : घरकाम, रा.घोरपडे गल्ली, पालम, ता.पालम जि.परभणी, ५. चंद्रकला भ्र. नागोराव देशमुख, (चंद्रकला पि.परशुराम शिंदे) वय : ५४ वर्षे, धंदा : घरकाम, रा.एन.डी.-३२, सी-७-५, हडको,नांदेड, ६. सचिन पि. विजयराव जाधव, वय : ३१ वर्षे, धंदा : व्यापार, रा.बुरुड गल्ली, किल्ला रोड, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ व ४ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत सरस्वतीबाई भ्र.परशुराम शिंदे यांचा मृत्यु दिनांक २०/१२/२०२५ रोजी आणि मयत परशुराम पि.मानिकराव शिंदे यांचा मृत्यु दिनांक २४/०९/१९९१ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ५ हे मयतांची मुले-मुली असून अर्जदार क्र.६ हा मयतांचा नातु आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ६ हे मयतांचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १४/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जाहीर प्रगटन

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३०७/२०२६
अर्जुन मोरे विरुद्ध ग्रामविकास अधिकारी

अर्जदार : अर्जुन देवानंद मोरे (अ.पा.क.) कल्पना देवानंद मोरे वय ४५ वर्ष धंदा मजुरी रा.कासारखेडा ता.नांदेड जि.नांदेड

गैरअर्जदार : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कासारखेडा,नांदेड

दावा : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार कल्पना भ्र.देवानंद मोरे वय ४५ वर्ष, धंदा मजुरी रा.कासारखेडा नांदेड ता.जि.नांदेड यांनी या न्यायालयात त्याचे मुलगा नामे अर्जुन पि.देवानंद मोरे यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी अर्जुन पि.देवानंद मोरे याचा जन्म दिनांक १८/०७/२०१० रोजी मौजे कासारखेडा येथे झाला असे नमुद केले आहे.

तरी अर्जदाराला अर्जुन पि.देवानंद मोरे यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २३/११/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २७.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
लिपीक फौजदारी विभाग
३ रे फौजदारी न्यायालय,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय,नांदेड

जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४१४/२०२६
विठ्ठल वि.ग्रामसेवक
नोटीस

अर्जदार : विठ्ठल माणिका भोसले वय-४५ वर्ष,रा.थुगांव ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय थुगांव नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार विठ्ठल माणिका भोसले वय ४५ वर्ष, रा. थुगाव ता.जि.नांदेड यांची मुलगी नामे गौरी विठ्ठल भोसले हिचा जन्म दिनांक ०४/०९/२०११ रोजी राहत्या घरी थुगाव ता.जि.नांदेड येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०८/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २३.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३५२/२०२६

अर्जदार : १. बालाजी पि.सुदाम गायकवाड, वय : ४७ वर्षे, धंदा : मजूरी, रा.घर क्रं.१-१४-१५३, राजीव गांधी शाळेजवळ, बालाजीनगर, नांदेड ता.जि.नांदेड.

विरुद्ध निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे, वरील अर्जदार मयत काळूबाई भ्र.सुदाम गायकवाड यांचा दिनांक : ०५/०८/२०२० व तसेच सुदाम पि.नागोराव गायकवाड यांचा दिनांक : ०७/०४/२००८ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे की, मयत हे अर्जदाराचे आई व वडील आहेत, अर्जदार क्र.१ हा मयताचा मुलगा आहे.

वर नमूद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून न्यायालयात दिनांक ३०/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक : ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
३ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,नांदेड

हदगावच्या रस्त्यांवर अवजड वाहनांचा विळखा;वाहतूक नियोजनाचा बोजवारा



हदगांव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, पोलीस आणि नगरपरिषद प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू असताना नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना किंवा पर्यायी वाहतूक व्यवस्थेची माहिती न दिल्याने वाहनधारकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच शहरातील प्रमुख रस्त्यांवर ट्रॅक्टर, मोठे ट्रक आणि अन्य मालवाहू अवजड वाहने मनमानीपणे उभी केली जात असल्याने वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे.

शहरातील मुख्य प्रवेशद्वारांपासून बाजारपेठेपर्यंत अनेक ठिकाणी अवजड वाहनांची बेशिस्त पार्किंग दिसून येत आहे. यामुळे पादचारी, दुचाकीस्वार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुख्य रस्त्यांवर वाहनांची वर्दळ आणि अवजड वाहनांची अनियंत्रित पार्किंग यामुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परिणामी अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.विशेष म्हणजे, हदगाव शहरात दर शुक्रवारी साप्ताहिक बाजार भरतो. या दिवशी तालुक्यातील ग्रामीण भागातून हजारो नागरिक खरेदी-विक्रीसाठी शहरात येतात. त्यामुळे बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांवर आधीच मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत अवजड वाहनांना शहरात मुक्त प्रवेश आणि रस्त्यांवर बेशिस्त पार्किंगची मुभा मिळत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या अधिकच गंभीर बनते.शुक्रवारी साप्ताहिक बाजाराच्या दिवशी तरी शहरातील प्रमुख मार्गांवर अवजड व लोडिंग वाहनांच्या प्रवेशावर आणि पार्किंगवर निश्चित वेळेसाठी निर्बंध घालण्यात यावेत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता मूलभूत नागरी प्रश्नांकडेही लक्ष देणे अपेक्षित आहे. आता तरी पोलीस प्रशासन, नगरपरिषद आणि लोकप्रतिनिधी या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन ठोस उपाययोजना करणार का, की नागरिकांना अशाच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार, याकडे हदगाव शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

मुखेड तालुक्यात ४ हजार ११ रेशन कार्ड अचानक बंद;काँग्रेसची पुनर्तपासणीची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यामध्ये सुमारे ४ हजार ११ शिधापत्रिका (रेशन कार्ड) अपात्र ठरवून बंद करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सध्याची तीव्र दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक मंदीच्या काळात गोरगरीब कुटुंबांना अन्नधान्यापासून वंचित ठेवणे अत्यंत अन्यायकारक असून,या सर्व बंद केलेल्या शिधापत्रिकांची पारदर्शक पुनर्तपासणी करून पात्र कुटुंबांचे रेशन तातडीने पूर्ववत सुरू करावे,अशी मागणी मुखेड काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी तहसीलदार मुखेड याच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अपात्र ठरवलेल्या सर्व ४ हजार ११ शिधापत्रिका-धारकांची सविस्तर यादी तहसील कार्यालयाच्या सूचना फलकावर व सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्ध करण्यात यावी.प्रत्येक संबंधित कुटुंबाला त्यांची शिधापत्रिका नेमक्या कोणत्या कारणास्तव बंद करण्यात आली, याची स्पष्ट व लेखी माहिती देण्यात यावी.कोणत्या आधारावर रेशन कार्ड बंद केले गेले,याची पारदर्शक पद्धतीने पुन्हा एकदा प्रत्यक्ष पाहणी व चौकशी करण्यात यावी.तांत्रिक किंवा चुकीच्या कारणांमुळे खाडाखोड झालेल्या शिधापत्रिकांची खातरजमा करून त्या दुरुस्त कराव्यात. पुनर्तपासणीनंतर जे कुटुंब पात्र आढळतील, त्यांची शिधापत्रिका तातडीने पूर्ववत करून त्यांना नियमित मिळणारे अन्नधान्य विनाविलंब वितरित करावे अशी मागणी हणमंत नारनाळीकर यांनी केली आहे. या निवेदनाची प्रत मा.जिल्हाधिकारी आणि मा.जिल्हा पुरवठा अधिकारी यांनाही सादर करण्यात आली आहे.

कोल्हा तलावात ईसापुर धरणाचे पाणी सोडावे-प्रवीण गायकवाड

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील वाई, वरदडा तांडा, कोल्हा, मेंडका, ढोलउमरी, शिवणगाव आदी गावे कोल्हा सिंचन तलावाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने परिसरातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी खालावली असून अनेक ठिकाणी पाणीस्रोत कोरडे पडले आहेत. ईसापुर धरणाचे पाणी कोल्हा तलावात सोडावे अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी केली आहे.



विशेषतः वाई व वरदडा तांडा या गावांना पाण्याचे अन्य पर्यायी स्रोत उपलब्ध नसल्याने येथील परिस्थिती चिंताजनक बनली आहे. भविष्यात उद्भवणारी पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी कोल्हा सिंचन तलावात उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्याद्वारे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी केली आहे.कोल्हा तलावात पाणी सोडल्यास परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होईल. परिणामी शेतीसह नागरिकांच्या आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागू शकतो. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित जलसंपदा विभाग व प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा गायकवाड यांनी व्यक्त केली आहे.

दुष्काळी संकटात शेतकरी,शेतमजूर व कष्टकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार-रामदास पाटील

देगलूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यासह देगलूर विधानसभा मतदारसंघावर दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले असून, या संकटाचा मोठा फटका शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. अशा कठीण परिस्थितीत जनतेने खचून न जाता धैर्य राखावे. असे आवाहन काँग्रेस नेते रामदास पाटील सुमठाणकर यांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनापासून मंत्रालय स्तरापर्यंत पाठपुरावा करून शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्षाची संपूर्ण टीम प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही काँग्रेस नेते रामदास पाटील सुमठाणकर यांनी दिली. गेल्या दीड महिन्यापासून काँग्रेसचे तालुकाध्यक्ष, विविध सेलचे पदाधिकारी यांच्या सहकार्याने देगलूर तालुक्यातील पाचही सर्कलमध्ये जवळपास १०५ ते १०६ गावांमध्ये दुष्काळी संवाद दौरा राबविण्यात आला.या दौऱ्यात पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा, पशुधन नोंदणी, वीजपुरवठा, बँकिंग, एसटी महामंडळ तसेच विविध प्रशासकीय विभागांशी संबंधित समस्या जाणून घेण्यात आल्या. आगामी आठवड्यात खासदार



आणि जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून दुष्काळी परिस्थितीवर बैठक घेण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, चारा व पाण्याअभावी पशुधन विक्रीचे प्रमाण वाढत आहे. देगलूरच्या मोंढा मैदानात जनावरांच्या बाजारात एक लाख रुपये किमतीचे जनावर ६० ते ६५ हजार रुपयांना विकावे लागत असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या सर्व जनावरांची पशुवैद्यकीय विभागाकडे शंभर टक्के नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच अनेक गावांमध्ये अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी येत असून, संबंधित विभागांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. करडखेड धरणातील गाळाची समस्या दूर करणे, पारंपरिक विहिरींचे खोलीकरण, नाल्यांचे खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. याशिवाय खासगी फायनान्स कंपन्यांनी दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी अन्यायकारक दबाव आणू नये. अशा तक्रारी आल्यास शेतकऱ्यांच्या बाजूने ठामपणे उभे राहू, असा इशाराही त्यांनी दिला. शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी खंबीरपणे उभे राहतील. अशी ग्वाही देत रामदास पाटील सुमठाणकर यांनी सर्वांना दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ५५४ कोटी रुपये जमा

नांदेड/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ५४ हजार ९१० पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर आज ५५४ कोटी ८४ लाख रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यापूर्वीच्या लाभार्थ्यांसह जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १ लाख ५७ हजार १२८ पात्र शेतकऱ्यांना १ हजार ४१६ कोटी ४० लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेले आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले तसेच ३१ मार्च पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे.योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने विकसित केलेल्या योजना प्रणालीवर नांदेड जिल्ह्यातील बँकांनी एकूण २ लाख २४ हजार ८४७ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. संगणकीय प्रक्रियेनंतर २४ जुलै, ११ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर आणि २२ ऑक्टोबर रोजी पात्र शेतकऱ्यांच्या चार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २ हजार ७३ शेतकऱ्यांची नावे आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यापैकी १ लाख ६४ हजार ८०६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. यापूर्वी १ लाख २ हजार २१८ पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर ८६१ कोटी ५६ लाख रुपये जमा करण्यात आले होते. त्यानंतर आज ४ नोव्हेंबर रोजी आणखी ५४ हजार ९१० पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर ५५४ कोटी ८४ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

पत्रकार सचिन मोरे कुटुंबाला संजय भोसीकरांचा मदतीचा हात

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील ज्येष्ठ पत्रकार सचिन पाटील मोरे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत मोरे कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून, ऐन दिवाळीच्या सणात कुटुंबावर संकट कोसळले आहे. या घटनेची माहिती मिळताच कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी गुरुवारी मोरे यांच्या निवासस्थानी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच संकटग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक मदत देत



त्यांना धीर दिला.

मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) शॉर्टसर्किटमुळे मोरे यांच्या घराला अचानक आग लागली. आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केल्याने घरातील संसारोपयोगी साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या आगीत घरातील जीवनावश्यक वस्तूंसह इतर साहित्य जळून खाक झाले. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे मोरे कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर संजय भोसीकर यांनी तातडीने मोरे कुटुंबाची भेट घेण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनी आगीत झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना मानसिक आधार दिला. तसेच आर्थिक मदत देत या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या पाठीशी असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी कंधार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सय्यद सलीम सय्यद रहीम, सुरेश कल्लाळीकर, मगदुम कुरेशी, अशोक पाटील धर्मापुरीकर, शेख आरेश, शेख युसुफ भाई यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९५/२०२६
(CNR No.MHND10-001316-2026)

अर्जदार -

१ मन्नाबेगम भ्र.पाशा शेख वय-७० वर्षे धंदा-घरकाम रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड

२ खुर्शिदा बेगम पशुमियॉ कोल्देखास वय-६० वर्षे धंदा-घरकाम रा.नागनाथ मंदिराजवळ नागापूर ता.जि.नांदेड

३ सुलाताना बेगम गुलाब शेख वय-४१ वर्षे धंदा-घरकाम रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड

४ खालीदा भ्र.युनूस पठाण वय-४० वर्षे धंदा-घरकाम रा.मोहिजा परांडा ता.कंधार जि.नांदेड

५ आफरीन बेगम भ्र.इशराक अहेमद वय-२९ वर्षे धंदा-घरकाम रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे शेख पाशा शेख अब्दुला हे होते ते दिनांक २८/०२/२०२२ रोजी दर्गापुरा कंधार,ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, शेख पाशा शेख अब्दुला यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख पाशा शेख अब्दुला यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख पाशा शेख अब्दुला यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

हमदस्त-ॲड.बी.व्ही.पाटील

जा.क्र.१७०४/२०२६
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग न्यायालय कंधार
दि.०४/११/२०२६

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कंधार जि.नांदेड यांचे न्यायालयात
ईतर फौजदारी किरकोळ अर्ज १७९/२०२६

अर्जदार : शिवानंद एकनाथ कांबळे - वय-३० वर्षे, धंदा-शेती रा.कौठा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय कौठा ता.कंधार जि.नांदेड

सदरील जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, अर्जदार - शिवानंद एकनाथ कांबळे - वय - ३० वर्षे, धंदा-शेती रा. कौठा ता.कंधार जि.नांदेड यांनी त्याचे आजोबा विश्वनाथ नागोबा कांबळे यांच्या मृत्यूची नोंद घेण्याकरीता जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे वडील विश्वनाथ नागोबा कांबळे यांचा मृत्यु दिनांक १७/०७/१९९८ रोजी कौठा ता.कंधार जि.नांदेड येथे मृत्यु झाला असून मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखामध्ये घेण्यात आलेली नसल्यामुळे गैरअर्जदारास नावाची व मृत्युची दिनांकाची नोंद घेण्यासाठी आदेश पारीत करण्याबद्दल अर्ज दाखल केला आहे.

तरी त्याबाबत कोणाचे व ईतर व्यक्तीचे काही आक्षेप/काही सांगायचे असेल ते हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावेत. अन्यथा विचार केला जाणार नाहीत.

पुढील तारीख २६/११/२०२६ आहे.

आज दिनांक ०४.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधीक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय,कंधार

स्वाक्षरित/-
क.लि.

पान १ वरुन

'एमपीएससी'च्या गट-क...

गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रश्नपत्रिका आणि ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक तसेच वाहतूक या सर्व टप्प्यांवर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करण्यावरही समितीने भर दिला आहे. उच्चस्तरीय समितीच्या या शिफारशींमुळे राज्यातील स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या पदवाढ, वयोमर्यादा सवलत आणि परीक्षा सुरक्षेबाबतच्या मागण्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या शिफारशींची अंमलबजावणी राज्य सरकारच्या अंतिम मान्यतेनंतरच होणार असल्याने उमेदवारांचे लक्ष आता शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे

गोकुळचा सत्तासंघर्ष...

दिली आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सदस्यांच्या जनादेशाचा सन्मान केला पाहिजे, अशी भूमिका शिंदे गटाने घेतल्याचे समजते. दुसरीकडे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सतेज पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून गोकुळच्या लढाईत पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे या संघर्षाला राजकीय बळ मिळण्याची शक्यता आहे. ९ नोव्हेंबरच्या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पाटील यांनी केले असून, गोकुळचा सत्तासंघर्ष आता रस्त्यावर उतरणार आहे.

पोलीसांनी २४ तासात...

अटकेची नोंद न झाल्याचे कारण देऊन दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्याची घटनात्मक मुदत पुढे ढकलता येणार नाही.भारतीय संविधानाने अटक झालेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्याचे संरक्षण दिले आहे. या तरतुदीचा उद्देश पोलिसांच्या मनमानी कारवाईला आळा घालणे आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे हा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे पोलिस कोठडी आणि अटकेच्या प्रक्रियेत घटनात्मक नियमांचे पालन करण्याबाबत महत्त्वपूर्ण स्पष्टता निर्माण झाली आहे.

वनोपज वाहतुकीला ई-टीपीचे...

नांदेड जिल्ह्यातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यांनी या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेशात म्हटले आहे. सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंतच फर्निचर मार्ट चालू असणे बंधनकारक आहे. तरीसुद्धा किनवट तालुक्यातील काही फर्निचर मार्ट वनपथकाची नजर चुकवून रात्री उशिरापर्यंत दुकाने चालू ठेवीत असल्याच्या तक्रारी आहेत. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या फर्निचर मार्टवर चोरीचे लाकूड पुरवठा होण्याची शक्यता अनेकांनी व्यक्तविलीय. वनविभागही सजग असल्याने याही प्रकारावर आळा बसेल असा अनेकांनी विश्वास व्यक्तविलीय.

उस्मानशाही मिल पुन्हा...

शहराच्या विकासालाही चालना मिळेल. त्यामुळे मिल सुरू करण्यासाठी शासनाने आर्थिक नियोजन करून आवश्यक अनुदान द्यावे, अशी मागणी समितीने केली आहे. उस्मानशाही मिलच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नांदेडकरांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे समितीने म्हटले आहे. शासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन बंद पडलेली मिल पुन्हा सुरू करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा,अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. या आंदोलनात उस्मानशाही मिल संवर्धन समितीचे संयोजक तरुणम मोहम्मद यांच्यासह श्याम निलांबकर, बबन भारे, शेख शकील अहमद, किरण चिद्देवार, प्रा. मंजिरी रणगावकर, ललिता कुंभार, कावेरी दोने, सुभाष लांबडे, मुनाअली अब्बास, सत्यपाल सावंत, गणपतराव पांचाळ, संजय राक्षसे, काकासाहेब डावरें आदी सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४